# प्रभुतरुण

| वर्ष ५१ | अंक ०५ | मुंबई | डिसेंबर, २०१७ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना :* तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर**

*कार्यकारी संपादक मंडळ :* **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटये**


*संपादकीय*

## श्रद्धेची काठी

—सुहासिनी कीर्तिकर

रोजच्या रोज अगदी सवयीनं वर्तमानपत्र वाचलं जातं. नवीन पिढीला बातम्यांसाठी अनेक सोयी असतीलही. पण सवयीचा म्हणून काही एक रेटा असतोच ना! बातम्या वाचणं, त्यावर इतरांशी जमल्यास; नाही तर मनात तरी निदान 'रवंथ' करणं हा अनेकांचा उद्योगच असतो. बातम्या तरी आनंददायक असतात का? मोर्चा, आंदोलनं, खून, हाणामाऱ्या, राजकारणातील खेळी, अपघात, घातपात अशा अनेक घटनांनी या बातम्या लडबडलेल्या असतात. अलीकडच्या वर्तमानपत्रांनी दिलेली बातमीच पहा. परदेशात कुठेतरी संगीताचे 'कॉन्सर्ट' चालू होते. धुंद क्षण अनुभवणारी गर्दी. गर्दी आणि दर्दी यांचा मेळ. पण अचानक कशाला कशाचा मेळ नाही; असं घडलं. समोरच्या एका खिडकीतून उन्माद चढल्याप्रमाणे एका शाळकरी वयाच्या मुलानं बंदुकीच्या फैरी झाडल्या. या अंदाधुंदीत सुरांची धुंदी संपली. शंभर सव्वाशे माणसांच्या कलेवरांचा खच मैदानात पडला. हे असुरी काम त्या मुलानं का केलं? उत्तर नाही! हा कुठला उन्माद! संस्कृतीचं कसलंच दडपण त्या मुलावर नाही?... उत्तर नाही!

पण अशी वागण्यातील अकल्पित वळणं फक्त विदेशात आहेत, आपल्या भारतीय संस्कृतीत नाहीत; असं अजिबात नाही. अशीच वर्तमानपत्रातीलच अलीकडची एक बातमी. महाराष्ट्रातील एक वयस्क गृहस्थ वयोमानानुसारे वारले. त्यांचा मुलगा, सून परदेशात. शेजाऱ्यांनी कर्तव्य पाळून त्या मुलाला बातमी दिली. त्या गृहस्थांना एकटेपणात आधार याच शेजाऱ्यांनी दिला होता. आता अपेक्षा अशी की त्या मुलाने; निदान एकट्याने तरी; वडिलांच्या क्रियाकर्माला यावे. इतर निरवानिरव करावी. शेवटचे दर्शन घ्यावे वडिलांचे. पण झालं काय? त्या मुलानं फोनवरच त्या शेजाऱ्यांना सांगितलं, 'मला येता येणार नाही. यायचंही नाही. तुम्हीच काय ते करा.' मुलाच्या या 'पुत्रधर्मा'ची पेपरमध्ये केवढी मोठ्ठी बातमी! अन् वर चर्चाच चर्चा. कुटुंब व्यवस्थेला लागलेला सुरुंग, परदेशात वसल्यावर येणारी बेफिकिरी, पैशाचा माज... काय, काय! असं म्हणतात की माणसानं एरवी नाही तरी निदान 'मरणाला अन् कारणाला एकत्र यावं.' (कारण म्हणजे मंगल कार्य) पण 'आज' असा उगवलाय की हे सगळे समजच काळाच्या बासनात गुंडाळले गेलेत. फ्रान्सीस दिब्रीटो इटलीला गेले होते. त्या प्रवासातील, मुक्कामातील अनुभव त्यांनी आपल्या पुस्तकात लिहून ठेवले आहेत. त्यातील एक अनुभव वरील घटनेशी समांतर नाते सांगणाराच. इटलीतील चर्चमध्ये त्यांचा मुक्काम असताना एका घरी मयत झाले. त्याचे अंतीम सोपस्कार करण्याची जबाबदारी चर्चने फ्रान्सीसवर टाकली. ते मनात म्हणाले, 'आपल्या प्रवासातला हाही एक अनुभव.' ठरल्याप्रमाणे ते मयत झालेल्या घरी गेले. तर काय? घराच्या पुढील दरवाजावर एक चिठ्ठी अडकवलेली. 'आम्हाला ऑफीसला जाणे भाग आहे. कृपया आपण येत्या रविवारी संध्याकाळी यावे.' भारतात वाढलेले फ्रान्सीस चकीत. अर्थात् ठरल्याप्रमाणे ते रविवारी गेले. सोपस्कार करून त्या आत्म्याला मुक्ती दिली... वगैरे वगैरे. पण तेव्हा त्यांच्या मनात असा प्रश्न आलाच की हे भारतात घडले असते का? पण आता काय? काळ पुढे पुढेच धावतो आहे. म्हणूनच परदेशी वास्तव्य केलेल्या त्या मुलाने वडिलांच्या मरणानंतर शेजाऱ्यांनाच ती जबाबदारी निर्विकारपणे सोपवली ना?

इथे मला विंदा करंदीकरांचा एक गझल आठवतो आहे. (तो गझल; की ती गझल?; पण विंदांच्या त्या पुस्तकात 'निर्वाणीचे गझल' असेच शीर्षक आहे. ती गझल, त्या गझला. तो गझल, ते गझल. म्हणजे विंदांना तो गझलच अभिप्रेत असावा.) तर त्या निर्वाणीच्या गझलात ते म्हणतात,

बुरख्यात संस्कृतीच्या आहे पशू दडून;
प्रगटे अनेक रूपे! त्याला इलाज नाही.
असतो असा जिवाला तो ध्यास मूल्यवेधी
अस्वस्थता टळेना, त्याला इलाज नाही.
ज्यांना अनेक छिद्रे असल्याच सर्व नावा;
निर्दोष ना सुकाणू; त्याला इलाज नाही.
वृद्धापकाल येता जाणार तोल थोडा;
श्रद्धा बनेल काठी; त्याला इलाज नाही.

संस्कृतीच्या बुरख्यात पशू दडून बसलेत. छिद्र असलेल्या नावा हाकायला योग्य सुकाणू नाही... चालायचेच. वर दिलेल्या घटनांतून हेच तर प्रत्ययाला आले. 'त्याला इलाज नाही' हेच खरे. पण 'निवाणीचे'च असल्यामुळे या गझलातील शेवट मात्र दुर्लक्षिण्याजोगा नाही. 'श्रद्धा बनेल काठी. मुलगा विचारो, न विचारो. आपली कुटुंबसंस्कृतीवर श्रद्धा आहे. तोच आपला आधार. कुणी पिसाटाने अचानक गोळीबार करून संगीतातला सूर बेसूर केला तरी आपली अंतस्थ माणूसकीवर श्रद्धा आहेच आहे. कुणीतरी अनपेक्षितपणे या संस्कृतीचे आपल्या वागण्यातून दर्शन घडविते तेव्हा सुसंस्कृत असल्याचा विश्वास बसतो, 'मूल्यवेधी ध्यास' चळत नाही - ढळत नाही. या संदर्भात मला अरविंद गोखले यांची 'विघ्नहर्ती' नावाची कथा आठवतेय. यंदा विंदा करंदीकरांप्रमाणेच अरविंद गोखले यांचीही जन्मशताब्दी आहे. तर त्याही निमित्ताने ही कथा आठवणे उचितच.

त्या कथेत एक घर आहे. खालच्या माजघरात लग्नघाई सुरू आहे. त्या दिवशीचाच मुहूर्त. सगळीकडे आनंदी आनंद. अशा वेळी एक जिना चढून वरच्या खोलीत घरातला कर्ता - त्या वधूचा काका गंभीर आजारी. खाटेवर पडलेला. खोलीच्या दाराबाहेरच्या व्हरांड्यात मोठ्ठं कुंकू लावून, फुलांची वेणी अंबाड्यावर माळून, नथ घालून काकी ठेवणीतले नऊवारी नेसून बसलेल्या. खालून वर चहा घेऊन येणाऱ्या घरातल्या तरुणीला त्या सांगतात, ''काका झोपलेत. चहा नंतर घेऊ आम्ही. हो! अन् तुम्ही सारे जा. मी थांबेन काकांसोबत.'' ती तरुणी माघारी जाते. एखादे नाटकात घडावे तसा हा प्रसंग. नाट्यपूर्ण. पण खरे नाटक तर पुढेच आहे. काका झोपलेले. पण कायमचे. आता ही बातमी फुटली तर लग्नात विघ्न. एखाद्यावेळी लग्न पुढं ढकलता ढकलता मोडायचेही. म्हणून ही धीराची बाई सवाष्णीसारखी सजते. चेहरा हसरा ठेवते अन् लग्न पार पडू देते. म्हणून कथेचे शीर्षक 'विघ्नहर्ती' 'श्रद्धा. बनेल काठी'; त्याला इलाज नाही!' असाच साधारण प्रसंग 'फॅमिली कट्टा' सिनेमात आहे. वेगवेगळी विखुरली गेलेली मुलं आईवडिलांच्या लग्नाच्या पन्नासाव्या वाढदिवशी एकत्र येणार असतात. त्यातच वडिलांचा अचानक मृत्यू ओढवतो. अशावेळी मुलांच्या एकत्र येण्यातल्या आनंदावर विरजण पडू नये म्हणून आई तो मृत्यू लपवते... असे काहीसे कथानक.

मंडळी; संस्कृतीचे असेही दर्शन घडते तेव्हा वर्तमानपत्रातील धक्का देणाऱ्या बातम्या या कालिक स्वरूपाच्याच रहातात आपल्या मनात. म्हणतात ना; आजचे वर्तमानपत्र म्हणजे उद्याची रद्दी. तसे या अमानुषतेचे दर्शन घडवणाऱ्या बातम्याही आपण रद्दीत टाकतो. माणुसकीच्या शत्रूसंगे युद्ध मनोमन सुरू ठेवतो. 'त्याला इलाज नाही' म्हणत बातमीचा खात्मा करतो अन् 'श्रद्धेची काठी' मात्र सतत हाती ठेवतो. ही 'श्रद्धेची काठी' हाती धरूनच २०१७ सालच्या या शेवटच्या महिन्याला निरोप देवू या.

# Rao Bahadur M. V. Dhurandhar

- Sandeep Dahisarkar

*(भारतीय विद्या भवनतर्फे १५ सप्टेंबर २०१७ च्या 'भवन्स जर्नल' मध्ये आलेला श्री. संदीप दहिसरकरांचा हा लेख पुनःप्रकाशित करीत आहे. भवन्स जर्नलच्या संपादकांचे आणि लेखक दहिसरकर यांचे मनःपूर्वक आभार. या 'जर्नल'च्या मुखपृष्ठावर धुरंधरांच्याच लक्ष्मीचे चित्र आहे -सुहासिनी कीर्तिकर)*

This year marks the 150th birth anniversary of the great artist, Mahadev Vishwanath Dhurandhar from Bombay School. He is regarded as the second most popular and eminent Indian artist after Raja Ravi Varma in the first half of the 20th century C. E. Like Ravi Varma he created paintings based on Indian mythological and hostorical subjects. He was also a successful commercial artist whose paintings are also seen in the form of olegraphs, calendars, posters. Many were published in various books authored by C. A. Kincaid, Otto Rothfield, S. M. Edwards, Seth Purshotam Vishram Mawjee, A. K. Priyolkar and others.

Born to Vishwanath Krishnaji and Narmadabai in phanswadi, Mumbai on 18th March, 1876, he was brought up in kolhapur. His father was a respected personality in the kolhapur State. After passing the intermediate grade examination with good marks from the Rajaram high school, he also received some important tips from artist Abalal Rahiman in Kolhapur. Soon Mahadev came to Bombay to give his matriculation examination and got opportunity to see the Sir J. J. School of Art. Fascinated after seeing the collection of Graecoroman statues in the art school, he finally joined it in 1890 for higher education in art.

He was the first student to receive the 'Wadington Prize' in third grade class. Further in 1894 he was awarded the prestigious Mayo Medal for being the most capable student in the painting class. He also got an aportunity to participate in the Ajanta excursion where the cave murals were documented in 1895 under the able guidance of principal John Griffiths. Here he painted the panorama view of the caves in sepia in the imperial size. Before going to Ajanta, Griffiths wrote an article titled 'Monogram on Copper and Bronze Pottery' which was publised in the India Art Journal by the British Government. Griffiths made Dhurandhar draw hundreds of drawings of various vessels which were published in the same. In 1896, after the resignation of Artist N. G. Mantri, Dhurandhar was appointed as the new painting master at the art school.

**The five Gold Medals**

1. Dhurandhar was the first Indian painter to be awarded the very prestigious gold medal of the Bombay Art Society in 1895, when he was still a student of the Art school. Founded in 1888, the society encouraged fine arts, especially amateurs, and educated the native public to a true appreciation of its merits by organising the annual art exhibitions. Here he had exhibited total four paintings out of which `Do you come Lakshmi?' attracted the attention of the judges. It was purchased by an European art connoiseur on the first day of the exhibition itself. In this painting he depicts Bhadrapada Gauri Pujan scene, where the elder sister holds the 'Terda plant Goddess Gauri' and her mother is shown welcoming the goddess, the elder sister is surrounded by her two younger sisters happily watching the retuals.
2. In 1904, he won the second gold medal for a design of a meal at the Bombay industrial exhibition.
3. The third medal was awarded in 1907 at the industrial exhibition held in pandharpur for his painting titled 'Naivedya' It was purchased by a rich seth Narottam Morarji, who gifted the same to the then Maharaja of Kashmir. Here in this painting two ladies function as the main figures (one facing the viewer and the other elegantly climbing the steps of the temple) The painting has a background of a temple with many steps similar to his other water colour work 'Bhakticha sopan' Griffiths has also done a painting based on similiar theme. These paintings remainds one of the majestic Babulnath temple, its steps and the devotees walking down and climbing up to worship the lord. The title of the painting revolves around the lady facing the viewer as she holds the Naivedya thali or offerings covered with the banana leaf.
4. In 1910, he was awarded another gold medal at the jalgaon industrial Exhibition for his painting 'Brides Maids'. This painting depicts a seated bride (in yellow nauvari saree) talking to a lady and is surrounded by more than thirty pretty ladies in nauvari and pachvari sarees for the wedding. This painting is currently housed in the Sangli Museum, Maharashtra.
5. The last gold medal was awarded to him in 1912 at the industrial Exhibition, Gwalior. It was an imperial size water colour painting titled "Homage to their majesties king & Queen' in 1911, King Emperor George V, the only British ruler attended his own durbar in Delhi along with his consort, Queen Empress Mary. The painting depicts both Emperor and Empress surrounded by ladies in different costumes from different regions and states welcoming and paying homage to their rulers. This painting is currently at the Delhi Art Gallery.

**Other Achievements**

His talents and achievements made him a successful artist. He was not only patronised by various pricely states viz. Baroda, Palanpur, Aundh, chhota Udaipur, etc. but also by the wealthy merchant class of the Bombay Presidecy. He also exhibited a painting titled 'Glory of Pandharpur' at the Webley Exhibition, London in 1924.

The 'British Empire Review' wholeheartedly appreciated this work in the following words :

'Mr. M. V. Dhurandhar's Glory of pandharpur', was a remarkable pictorial record of a no less remarkable scene. This widely known artist gave us in the work a vivid glimpse of a celebrated place of pilgrimage in the Bombay Presidency which contains shree Vithal's Temple.The Crowed of people whom he depicted as dancing with such wonderful fervour were, no doubt, chanting their invocations to the God to reveal himself in his incarnate bodily form.'

Soon Dhurandhar was awarded the title of 'Rao Bahadur' in 1928 at poona by the British India government. Hence, he became the first Indian painter to be honoured with such a prestigious title. Meanwhile, a scheme of decorating imperial secretariat building and Viceroy's house at New Delhi was passed. Dhurandhar was commissioned to decorate the Hon. Law Member's room at the imperial Secretariat. He did four paintings, out of which 'Stridhanam' and 'Dattavidhan' were based on the Hindu Law, 'Donation at the time of death' on Muslim law and 'the early system of law in Hundustan during British Raj.' A small copy of the painting 'Stridhanam' was purchased by Queen Mary in an exhibition of Bombay school artists held in London. This painting was already part of sir Leslie Wilson's private collection which he had personally given to display at the exhibition. But by the order of the Queen, a second copy of the same painting was made for Sir Leslie Wilson by Dhurandhar. She wanted to see her Indian subjects through this painting always in front of her own eyes at the Buckingham palace. Dhurandhar also worked on various posts as Inspector of Arts and Crafts, Visiting Professor of Painting and Officiating Director (When capt. Cladstone solomon was on leave) at the school of Art.

**Pathare Prabhu Culture**

Dhurandhar painted the subjects of Hindu Gods and historical of Hindu Gods and historical paintings. He handled all branches of Paintings like designs of medals & trophies, landscapes, protraits, posters, illustrations for books and magazines, etc. He painted series of paintings based on Ramayana, Mahabharat, Nala Damyanti, Ragamalika, seasons, Chhatrapati Shivaji, etc.

Apart from these paintings he also painted contemporary events and life of common people and various communities in the Indian society. This also included paintings on the rituals of the Pathare Prabhu Community of Bombay City. Dhurandhar beloged to this community and showcased rituals performed on their various festivals. This included Deep pujana of Deep (Deevali) or Ashadhi amavasya (a priest performing deep pujan assised by two prabhu ladies at a prabhu house), Nagapanchami (a traditional pata with Dhurandhar's modern drawings) and pithori Ceremony of Bhadrapada amavasya (Two ladies worshipping 64 pithoris or yoginis) His daughter, Ambika, has also done a painting of Goddess Ambika with 64 Yoginis.

As described earlier, his 'Do you come Lakshmi? is based on Gauri pujan of Pathare Prabhus. In the background of this painting the Gauri pata on the wall and the Goddess's foot prints on the floor (made with hands only by ladies with sandalwood paste indicates that the goddess has entered the house) are visible. These paintings not only marked one familiear with the rich social life of the Prabhus but also describes their status and position in the society. These paintings are important evidences of the rituals practied by the Prabhus in the British Raj.

(Cont. on page 5 col. 1)

कथाकली

# हक्क

-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर

अगोदरच्या परीक्षांच्या फेऱ्या संपून पुढच्या परीक्षेसाठी सर्वांनी एका खोलीत प्रवेश केला.

तिकडे एक मोठं टेबल होतं. त्या टेबलाभोवती खुर्च्या मांडल्या होत्या. पर्यवेक्षकाच्या सूचनेनुसार सर्वजण त्या खुर्च्यांवर स्थानापन्न झाले. त्यानं प्रत्येकाच्या हातात एक कागद दिला.

आर्चितनंसुद्धा स्वत:च्या हातातल्या कागदावर नजर फिरवली...

बापरे!... एक क्षण त्याचं हृदय धडधडलं... त्या कागदावर एका खाली एक असे काही शब्द लिहिलेले होते. पर्यवेक्षकानं बोलायला सुरुवात केली... ''तुमच्या हातातल्या कागदांवर विषय लिहिलेले आहेत. मी ज्याला बोलायला सांगेन त्यानं कोणत्याही एका विषयावर बोलायचं. विचार करायला जास्त वेळ मिळणार नाही. मी सांगितलं की ताबडतोब दोनतीन सेकंदांत बोलायला सुरुवात करायची...''आर्चितला पुन्हा भिती वाटू लागली.

दोन तीन सेकंदात सुरुवात करायची?... पण बोलायचं तरी काय? जरा तरी वेळ द्यायला हवा होता. तो घाबरला. त्याची नजर आजूबाजूला अरूणला शोधू लागली. त्याला अरुण दिसेना.

अर्चित कावराबावरा झाला. त्याला नवल वाटलं... मघाशी तर अरुण माझ्याच बरोबर आत आला. आजुबाजूला दिसत कसा नाहीय?... आर्चितला घाम फुटला. त्यानं खिशातून रूमाल काढून तोंडावरून फिरवायला सुरूवात केली... कपाळावरचा घाम पुसून त्यानं डोळ्यांवरून रुमाल फिरवला.

तेवढ्यात त्याला ऐकू आलं - ''अर्चित, ही घे पाण्याची बाटली.'' अर्चितनं चटकन रुमाल बाजूला करून आवाजाच्या दिशेनं बघितलं... त्याच्या समोरच्या खुर्चीवरून येणारा तो आवाज अरूणचा होता. त्याला बघताच अर्चित आनंदानं हसला नी म्हणाला - ''मला कसा दिसला नाहीस?''

''अरे, मघाशी हातातला कागद खाली पडला तो उचलायला वाकलो तेव्हा तू इकडे तिकडे बघत होतास...''

पर्यवेक्षकानं सगळ्यांना गप्प बसण्याची सूचना केली आणि तो म्हणाला - ''सगळ्यांनी बसूनच बोलायचं आहे. उभं राहून बोलण्याची आवश्यकता नाही.''

हे ऐकताच अर्चितला थोडं बरं वाटलं. पण हातातल्या कागदाकडे नजर जाताच तो जरा गंभीरच झाला. त्याच्या मनात आलं. शाळा कॉलेजमध्ये परीक्षांमध्ये निबंध लिहिणं कठीण वाटायचं. आत्ताच्या ह्या बोलण्यापेक्षा ते निश्चितच सोपं होतं असं आता वाटतंय... पर्यवेक्षक एक एक नाव उच्चारू लागला. एकेकजण हव्या त्या विषयावर बोलायचा प्रयत्न करू लागला. सहासात उमेदवारांचं बोलणं संपेपर्यंत अर्चित आशानिराशेच्या झुल्यावर पुन्हा झुलू लागला. काही मुलं छान बोलत होती. ते ऐकून अर्चितच्या मनात येत होतं - 'बापरे'! त्यांना किती पटकन नी किती छान बोलायला जमतंय! आपल्याला असं नाही जमलं तर?... तर... आपण नक्कीच फेल होणार... नाहीच जमायचं आपल्याला एवढं सुंदर अस्खलित बोलणं. दोन वाक्यांमध्ये एका सेकंदाचाही वेळ ही मुलं घालवत नाहीत. मला कसं जमणार हे? - छे!... मला नाही वाटत मला ही फेरी पार करता येईल...

मनातले हे विचार सांभाळीतच अर्चित त्या मुलांचं बोलणं ऐकायचा प्रयत्न करीत होता. त्यांनं स्वत: कोणत्या विषयावर बोलावं ह्याचाही अंदाज घेत होता. तीन चार मुलं चांगलं बोलल्यानंतर एका मुलीनं बोलायला सुरुवात केली. दर वाक्यानंतर ती 'अं...' 'अं...' करू लागली. जेमतेम सात आठ वाक्यं ती बोलली... आणि तिनं... बोलण्याचा प्रयत्न करणंसुद्धा सोडून दिलं.

अर्चितनं पर्यवेक्षकाकडे बघितलं. त्याचा चेहरा निर्विकार होता. त्या मुलीचं भवितव्य पर्यवक्षकाच्या चेहऱ्यावरून मुळीसुद्धा कळत नव्हतं. तिच्या पाठोपाठ एक मुलगा नी एक मुलगी त्याच वाटेनं अडखळत गेले... आर्चितची आता पक्की खात्री झाली की त्यांचंही हे असंच होणार. मघाशी नैराश्य आलं ते ती मुलं नक्कीच नापास होणार म्हणून. आता त्याचं मन निराशेच्या गर्तेत अधिकच खोल जाऊं लागलं ते ही मुलं जशी नापास होणार तसाच तो स्वत:ही नापास होणार म्हणून... त्याचं लक्ष त्या एकंदर फेरीवरूनच उडू लागलं... मन भरकटू लागलं.

तेवढ्यात पर्यवेक्षकानं आरूषचं नाव उच्चारलं. आर्चितचं लक्ष आरूषकडे एकवटलं. आरूषनं विषय जाहीर केला - 'आत्मविश्वास' आणि निमिषार्धात त्यानं अस्खलितपणे बोलायला सुरुवात केली - ''आत्मविश्वास सगळ्यांकडे नसतो असं आपल्याला वाटतं. खरं तर तो प्रत्येकाकडे असतो. फक्त तो सुप्त अवस्थेत असल्यामुळे तो आपल्याला कळत नाही. प्रत्येकाने स्वत:मधला आत्मविश्वास जागवायला हवा...'' आरूष प्रत्येक वाक्य शब्दांवर जोर देत उच्चारत होता. सुरूवातीला तो पर्यवेक्षकाकडे न बघता त्याच्याकडे एकटक बघणाऱ्या अर्चितच्या डोळ्यात बघत वाक्यं उच्चारत होता. नंतर मात्र त्यानं पर्यवेक्षकाकडे नजर वळवली. तेव्हा त्याचं अर्चितकडे मुळीच लक्ष नव्हतं. आणि आता सुरुवातीच्या त्याच्या बोलण्याचं सार मनात उतरलेल्या अर्चितला आरूषचं लक्ष त्याच्याकडे नसलं तरी त्याची पर्वा नव्हती....

कारण आरूषचा आत्मविश्वास आता अर्चितचा आत्मविश्वास बनला होता. त्याच्या मनानं एक विषय निवडला. आता त्याचं मन शांत होतं. त्या निवडलेल्या विषयावर अर्चित विचार करू लागला. त्याचा विषय होता - ''परीक्षा'' आरूषचं बोलणं कधी संपलं नी अर्चितचं नाव कधी पुकारलं होतं ते अर्चितला कळलंच नाही. पण नाव उच्चारलं गेल्यानंतर मनाची प्रतिक्षिप्त क्रिया म्हणून नकळतच आर्चित ''परीक्षा' ह्या विषयावर बोलू लागला... आता त्याला दिसत होता फक्त त्याच्या पुढचा विषय.... तो आजूबाजूचं जग विसरला. त्याचं सगळं लक्ष फक्त त्या विषयावर केंद्रित झालं. तो बोलतच होता... ''सर्व आयुष्यभर परीक्षा चालूच असते. त्या परीक्षेत सर्व जग उमेदवार असतं. परीक्षेत उत्तीर्ण होण्याची आस प्रत्येकाला असते. नियतीनं घातलेलं गणित सोडवण्याची प्रत्येकाची रीत वेगळी असते. कधी कधी रीत चुकते. आयुष्याचं गणित सुटता सुटत नाही. तरीही ह्या जगातला प्रत्येक उमेदवार कसोशीने प्रयत्न करीतच असतो. कधी त्या गणिताचं उत्तर पटकन सापडतं. पण कधी कधी मात्र आयुष्याच्या शेवटी कळतं की गणिताची रीतच चुकीची होती. मात्र तेव्हा परीक्षेची वेळ संपत आलेली असते...''

अर्चितचं प्रत्येक वाक्य त्याच्या मनाच्या उत्कटतेतून उमटत होतं. अर्चितच्या मनाच्या ह्या उन्मनी अवस्थेतच परीक्षेची ती फेरी संपली. पर्यवेक्षकानं यशस्वी उमेदवारांची नावं जाहीर केली. तो म्हणाला - ''ह्या फेरीत मिळालेल्या गुणांप्रमाणे मी नावं जाहीर करतो... अर्चित देशपांडे, अरुण मोहिले...'' ह्या क्रमानं त्यानं बाकीची नावं पुकारली. आणि तो म्हणाला.. ह्या यादीत ज्यांची नावं नाहीत, त्यांनी घरी जावं...''

अर्चित भान हरपून ऐकत होता... तो भानावर आला तेव्हा आरूष त्याचा हात हातात घेउन जोरजोरात हलवून म्हणत होता, 'अर्चित तू ह्या फेरीत पहिला आलायस... चक्क पहिला!'' अर्चितनं भानावर येत आरूषकडे बघितलं आणि पुन्हा विचारलं ''काय म्हणालास? पुन्हा सांग....''


''अरे, तू ह्या फेरीत पहिला आलायस...'' आरूषच्या ह्या शब्दांचा अर्थ अर्चितच्या मनात झिरपायला लागला. तसा तो आनंदानं म्हणाला - ''खरंच आरूष? खरंच सांगतोयस?''

''होय रे! खरंच!'' आरूष उद्गारला.. ''आरूष मी जिंकलो?''

''होय अर्चित, तू जिंकलास'' - आरूषनंही आनंदान उत्तर दिलं.

(पान ५ कॉलम ३ वर)

हसरी रेखा -प्रदीप कोठारे



## पा. प्र. सोशल समाजाच्या विविध स्पर्धा

(जयंत कीर्तिकर)

सोशल समाजाच्या पा. प्र. हाऊसिंग सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आलेल्या विविध स्पर्धा यंदा रविवार दि. ५ सप्टेंबर २०१७ रोजी खारच्या हाऊसिंग सोसायटीच्या संस्कृतिक सभागृहात अतिशय उत्साहात पार पडल्या. एकूण ६ विषयांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. रांगोळी, चित्रकला, हस्तकला, संगीत, फॅन्सी ड्रेस आणि एकपात्री अभिनयस्पर्धा! या सर्व स्पर्धाचे यश बाल गोपाळांच्या प्रचंड उत्साहात सामावले होते. थोरांपेक्षा लहानांचा उत्साह आणि संख्या अधिक होती म्हणजे आपल्या ज्ञातीची पुढची पिढी या कलाविष्कारात बरीच उज्ज्वल भवितव्य घडवील यात शंका नाही. बालगोपाळांच्या सर्वच मातांनी स्वत: जरी या स्पर्धात सहभाग घेतला नसला तरी आपल्या मुलांना सर्वतोपरी उत्तेजन देण्यात त्या कुठेही कमी पडल्या नाहीत. त्यामुळे ही छोटी कंपनी सर्वच स्पर्धांमध्ये हिरीरीने उतरली आणि त्यांनी प्रेक्षकांची वाहवा आणि समाजातर्फे बक्षिसे व प्रमाणपत्रे पटकावली. रांगोळी, चित्रकला व हस्तकला या स्पर्धाचे परीक्षण समाजाच्या उपाध्यक्षा श्रीमती स्वाती जयकर यांनी केले तर संगीत, फॅन्सिड्रेस व एकपात्री अभिनय स्पर्धाचे परीक्षण सौ. विभा कामत यांनी केले. समाजाध्यक्षा श्रीम. स्वाती राणे यांनी त्यांचा परिचय करून दिला व त्यांना समाजातर्फे भेटवस्तू देण्यात आली. श्रीम. स्वाती जयकरांनी आपले मनोगत व्यक्त करताना आपल्या परीक्षणाचे सांगोपांग विवेचन केले व स्पर्धकांना बहुमोल सल्ला दिला. सर्व स्पर्धकांना समाजाध्यक्षांच्या स्वाक्षरीची प्रमाणपत्रे वितरीत करण्यात आली.

बालगोपाळांना बिस्किटांचे पुडे आणि उपस्थितांना समाजातर्फे कॉफी देण्यात आली. सर्व विजेत्यांना समाजाच्या विश्वस्त श्रीम. वृंदा जयकर, हाऊसिंग सोसायटीचे अध्यक्ष श्री. अशोक तळपदे व समाजाच्या अध्यक्षा श्रीम. स्वाती राणे यांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली.

या स्पर्धांमध्ये लहान मुलांबरोबरच मोठ्यांनीही अधिक संख्येने सहभागी व्हावे, अशी अपेक्षा श्री. नंदकुमार विजयकरांनी व्यक्त केली आणि त्यांनी त्यांना मिळालेल्या बक्षिसाची रक्कम समाजाला देणगी म्हणून देऊन समाजावरील त्यांच्या लोभाचे एक उत्तम उदाहरण घालून दिले.

एकूणच स्पर्धांचा हा कार्यक्रम अतिशय सुनियोजित व उत्तमरित्या पार पडला.

स्पर्धाचे निकाल पुढीलप्रमाणे -

१) रांगोळी स्पर्धा - (गट अ - १५ वर्षांखालील) विषय - शुभ दीपावली

प्रथम क्रमांक -कुमारी चैतन्या नितीश कीर्तिकर, द्वितीय क्रमांक- कुमारी रितिका राहुल जयकर, तृतीय क्रमांक- कुमारी आकांक्षा प्रसाद कोठारे

(गट 'ब' - १५ वर्षांवरील) विषय - आकाश कंदील

प्रथम-सौ. शुभांगी निलेश कोठारे, द्वितीय-सौ. श्वेता असित तळपदे, तृतीय सौ. सुगंधा शिरीष कोठारे

२) चित्रकला स्पर्धा - (गट 'अ' - ५ ते ८ वर्षे) विषय - फुलपाखरू

प्रथम- कुमार पर्जन्य पवन कीर्तिकर द्वितीय-कुमारी सौम्या निलेश कोठारे, तृतीय- कुमारी अवंती असित तळपदे

(गट 'ब' - ९ ते १५ वर्षे) विषय - ग्रीटिंग कार्ड

प्रथम-कुमारी आकांक्षा प्रसाद कोठारे, द्वितीय-कुमारी रितिका राहुल जयकर, तृतीय- कुमारी अनिका विवेक विजयकर,

(गट - क - १५ वर्षांवरील) विषय बर्थ डे पार्टी

प्रथम- सौ. प्रांजल पवन कीर्तिकर, द्वितीय-सौ. प्राची कुणाल वेलकर, तृतीय- सौ. शुभांगी निलेश कोठारे

३) हस्तकला स्पर्धा - (गट 'अ' - ५ ते ८ वर्षे) विषय - कागदी होड्या बनवणे

प्रथम- कुमार पर्जन्य पवन कीर्तिकर, द्वितीय-कुमार अश्विन असित तळपदे, तृतीय-कुमारी सौम्या निलेश कोठारे

(गट 'ब' - ९ ते १५ वर्षे ) विषय - काड्यापेटीचा सोफा सेट बनवणे

प्रथम- कुमारी रितिका राहुल जयकर, द्वितीय- कुमारी आंचल शैलेश तळपदे, तृतीय- कुमारी चैतन्या नितीश कीर्तिकर

(गट 'क' - १५ वर्षांवरील) - विषय - ५ कोड्या तयार करणे

प्रथम- सौ. प्रांजल पवन कीर्तिकर, द्वितीय - सौ. शुभांगी निलेश कोठारे

४) संगीत स्पर्धा : - (गट 'अ' - ५ ते ८ वर्षे) विषय - पावसाचे गाणे

प्रथम क्रमांक -कुमार पर्जन्य पवन किर्तीकर, द्वितीय क्रमांक-कुमारी किमया अपूर्व कोठारे, तृतीय क्रमांक -कुमार अमोघ अभिजित कोठारे

(गट 'क' - १५ वर्षावरील)

विषय - नाट्यगीत

प्रथम- सौ. स्नेहा अजित राणे, द्वितीय-श्रीमती क्षमा पद्मकुमार कोठारे, तृतीय-सौ. योगिता किरण नवलकर

५) फॅन्सी ड्रेस स्पर्धा - (गट 'अ' - ५ ते ८ वर्षे)

प्रथम क्रमांक-कुमारी अवंती असित तळपदे, द्रितीय- कुमार विवान श्रीपाद आगासकर, तृतीय-(विभागून) कु. पर्जन्य पवन कीर्तिकर - कुमारी किमया अपूर्व कोठारे

(गट 'ब' - ९ ते १५ वर्षे)

कुमारी चैतन्या नितीश कीर्तिकर - समाज प्राईज

(गट 'क' - १५ वर्षावरील)

श्री. नंदकुमार कृष्णराव विजयकर - समाज प्राईज

५) एकपात्री अभिनय स्पर्धा - (गट 'अ' - ५ ते ८ वर्षे)

(गट 'क' - १५ वर्षावरील)

प्रथम क्रमांक- श्रीमती क्षमा पद्मकुमार कोठारे द्वितीय क्रमांव–सौ. प्राची कुणाल वेलकर, तृतीय क्रमांक- श्री. नंदकुमार कृष्णराव विजयकर

*

## BOX - CRICKET TOURNAMENT

**Reported by - Jayant Kirtikar**

Tennis Ball box - cricket tournament organised jointly by pathare prabhu social samaj and houshy kala mandir and co-sponsored by Mr. Anil Rao, in memory of his father late Mr. P. K. Rao, founder of pathare prabhu cricketers on the occassion of his 100th Birth Anniversary year; was held on 19th Nov. 2017 from 8 am onwards at the wellingdon crescent stands, near milan sub-way, santa cruz (w),

Mr. Jayant kirtikar, Jt. secretary of Pathare Prabhu Social Samaj and Mr Atul Jaykar on behalf of houshy kala mandir welcomed everybody, after which 2 minute silence was observed in memory of late Mr. Sujit Y. Kirtikar, his son late Mr. rajesh S. Kirtikar and late Mr. Naresh S. Mankar jt. secretary of pathare prabhu social club, all of them lovers of cricket and regular sponsors of cricket tournaments in the past. Mr. Anil Rao inaugurated the tournament and in his speech spoke in glowing terms about the love of cricket among the pathare prabhus, especially his father, late mr. P. K. Rao, who had organised sheela - cup tournament for females in the past. Mr. Rao donated a handsome amount of Rs. 25000/- for the tournament.

This year two teams comprising of 8 players each including a female, a senior citizen and a teenager participated in the tournament. 8 year old Shaurya Nayak won the youngest player and Mr. Diwakar Kothare was the young old man at 77 years. won the eldest. Team B led by Kunal Velkar won the tournament jt, included Miss Aanchal Talpade, Arihan Velkar, Raj Kirtikar, Ishan Kothare, Tanmay Vijayakar, Ashish Desai and Krish Mankar. Team C captained by Rajas Vijayakar were the runners up. This team comprised of Mrs. Pallavi Kothare, Diwakar Kothare, Mehul Kothare, Akshay Kirtikar, Yug Kothare and Nitin Navalkar. The best Fielder Trophy was won by Raj Kirtikar, The best Bowler Trophy went to Tanmay Vijayakar and the best batsman was Mr. Krish Mankar. The coveted man of tournament trophy was also won by Krish Mankar for his all-round performance. All female participants were awarded special trophies. About 200 spectators had come to watch the tournament and cheer their near and dear ones.

Besides Mr Anil Rao, many others sponsored donated for the tournament. Mr. Charudutt Dhairyawan sponsored snacks, and Mrs. Neeta Senjit sponsored the tennis Balls. Smt. Meena Pradhan & Mr. Sunil Jayakar were among the other donors.

The Tournament Organising committee comprised of Mr. Jayant Kirtikar, Mrs. Neeta Senjit, Mr Vijay Dhurandhar and Mr. Prasad Kirtikar of the Pathare Prabhu Social Samaj and Mr. Atul Jayakar, Mr. Ajit Jayakar, Mr. Rohit Jayakar & Mr. Sudhir Dhurandhar of the Houshy Kala Mandir. Mr. Sunil Jayakar and Mr. Abhijit Vijayakar also assisted the organising committee. All the meetings were held at the residence of Mr. Ajit Jayakar for which the organising committee is thankfull to him. The catering for the tournament was efficiently arranged by Mr. Sudhir Dhurandhar ably assisted by Mr. Suru Kothare, all those present were provided Breakfast Lunch & Tea by P. P. Social Samaj and Houshy Kala Mandir.

Special thanks to Mr. Rohit Jayakar for expertly planning, organising and executing the tournament. Official umpires and scorer from the MCA (Mumbai Cricket Association) were arranged by Mr. Vijay Dhurandhar.

Mr. Shrikant Tigdi, MCA Managing Committee members and maindan committee secretary kindly consensted to preside over the prize distribution ceremony. with him were Mr. Rajan Phatarphekar and Mr. Dawoodbhai of MCA. Mr. Tigdi was felicilated by P. P. Social Samaj president Smt. Swati Rane. Mr. Tigdi Spoke about his association with the pathare Prabhu community in glowing terms and remembered playing alongside Raju Talpade, Vijay Dhurandhar, Abhay Kirtikar and Rohit Jayakar during the old days.

The tournament ended at about 5.30 pm with a promise to play again next year.

# नाती... Realationship

-रंजना तळपदे

नातं म्हटलं की डोळ्यासमोर अनेक उदाहरणं येतात. नवरा बायको, सासू-सून, बहीण-भाऊ, जावा-जावा, भाऊ-भाऊ, बहिणी-बहिणी, आई-मुलगी, मुलगा-वडील, नणंद भावजय, मित्र-मैत्रिणी वगैरे वगैरे. ही सर्व नाती पूर्वी अगदी प्रामाणिकपणे जोपासली जायची. एकमेकांबद्दल माया-ममता, प्रेम-आपुलकी होती. ह्याचे मूळ कारण कदाचित एकत्र कुटुंब किंवा पुरुष प्रधान संस्कृती असू शकते.

आता काळ बदललाय. एक तर एकत्र कुटुंब संपुष्टात आलंय किंवा हम दो, हमारे दो नाहीतर हम दो हमारा एक. त्यामुळे कुटुंबाचा आकार कमी होत चाललंय. आणि आता तर Mobile/computer / Face Book/Wattsapp मुळे तर एकमेकांकडे जाणेही खुंटले आहे. कधीतरी समारंभाला भेटी होतात. काही वेळेला तर मुलांना ओळख करून द्यायला लागते - ही आत्या, ही मावशी, हे काका, हे मामा. ते सुद्धा मुले समारंभाला हजर असतील तरच. नाहीतर नाहीच.

दुसरी बाजू म्हणजे जे काही संबंध असतात ते काही समजुती-गैरसमजुतीमुळे दुरावले जातात. अगदी रक्ताच्या नात्यांचेसुद्धा, जसे बहिणी-बहिणी, भाऊ-भाऊ किंवा काही वेळेला तर आई-वडीलसुद्धा. ही तर खूप खेदाची गोष्ट आहे. एकाच आईच्या उदरातून आलेली मुले एकमेकांची तोंडसुद्धा पहात नाहीत ही आणखीनच लांछनास्पद बाब आहे. मग कशाला पाहिजेत नाती व संबंध?

हल्ली तर मुले विदेशात स्थायिक होतात व आई-वडिलांना त्यांची सर्व मालमत्ता लुबाडून वृद्धाश्रमात रवाना करतात.

त्यापेक्षा मैत्रीचं नातं त्यातल्यात्यात प्रामाणिक असते. बोलणे-भेटीपुरते तरी टिकते.

ही मी नात्यांबद्दल नकारात्मक बाजू दिली आहे पण अशी अनेक घरे आहेत जिथे अजूनही ही नाती प्रेमळपणे जोपासली गेली आहेत. ते सर्व महिनाकाठी किंवा सहा महिनाकाठी एकत्र भेटतात आणि एक प्रकारचे गेट-टुगेदर्स ठेवतात जेणेकरून थोडासा तरी ओलावा त्या नात्यात दिसतो. पण सगळ्यांना ते दिसत नाही.

म्हणून माझं तर असं प्रांजळ मत आहे की अति तिथे माती. जास्त कोणाबरोबर संबंध ठेऊच नये म्हणजे नातीही टिकून रहातात व हेवेदावे ह्यांना वाव नसतो. शेवटी माणूस हा स्वार्थी असतो. आजकालच्या जगात हरीचा लाल मिळणे जरा कठीणच. जमेल तेवढीच माणसं जोडावीत व अंतर ठेवून संबंध ठेवावेत म्हणजे नातीही टिकतील आणि कोणाची मने दुखवण्याचा प्रश्नच उद्भवणार नाही. आपण काही साधुसंत नाहीत. प्रत्येकाला इगो ही नावाची बाधा असते व ती सर्वनाश करते. शेवटी काय दोन दिवसाची दुनिया आज आहे तर उद्या नाही. कधी बोलावणे येईल, माहीत नाही म्हणून जमेल तेवढी नाती टिकवावीत व बाकीची सोडून द्यावीत.

*

(Cont. from page 2 col. 4)

**Conclusion**

Dhurandhar created a new language of paintings, developed his style and new imagery, more dramatic than the still figures of Raja Ravi Varma. If compared with the Saraswati of Raja Ravi Varma, Dhurandhar's Saraswati in Red Nauvari is seated gracefully on a peacock playing a Sitar, a popular north Indian musical instrument instead of a Sarasvati Veena. Also the Placement of rosary and pothi book and the way of holding them is not same in both the paintings. But Dhurandhar Committed a mistake by showing more than 20 frets in the sitar.

Also his Lakshmi at the time of samudramanthana is shown in a white saree instead of Red. Over oranmentation (i.e. variety of jewellery) is also observed here which is absent in Ravi Varma's work. The splashing water on the lotus with the blurred background of gods and demons performing sagaramanthan becomes alive and one can understand that Lakshmi has just appeared out of the Water. The ladies which he drew were fair, graceful, delicate, slender and had slim waist. Majority of his paintings show nearly dressed ladies in nauvari sarees which is also a significant marker of the early phase of naturalistic art of the Bombay school. His painting, for example, the Brides' maids, depicts more than thirty Pathare Prabhu ladies on a single piece of canvas. Every lady here is beautiful and different. He had mastered the art of showing many figures in a painting which is not common in Ravi Varma's works. Many such paintings also had magnficent and grand backgrounds. The accurate life forms by Dhurandhar are elegant and have influence of Mannerism. Dhurandhar's art truly has an old colonial charm which is a unique combination of European idealism and Indian aesthetics and symbolism.

*

# पाठारे प्रभु सोशल समाज - दिवाळी महोत्सव

(सुहासिनी कीर्तिकर)

२५ नोव्हेंबर २०१७ रोजी समाजाने खारच्या आपल्या सांस्कृतिक केंद्रात दिवाळी संगीत महोत्सव साजरा केला. या सोहळ्याचे प्रमुख पाहुणे होते श्री. रंजन खंडेराव विजयकर. त्यांची ओळख समाजाध्यक्षा स्वाती राणे यांनी बालपणीच्या आठवणींना उजाळा देत छान करून दिली. सौ. व श्री. रंजन विजयकरांचा त्यांच्या हस्ते सत्कार झाला. श्री. रंजन विजयकरांनी खुसखुशीत शब्दात समाजाच्या जुन्या आठवणींना उजाळा देत भाषण केले. आभार मानले कार्यवाह श्री. जयंत कीर्तिकर यांनी. यावेळी श्री. रंजन विजयकरांनी समाजाला पाच हजारांची देणगी दिली.

हा संगीत महोत्सव असल्याने प्रमुख पाहुण्यांचा सत्कारादी कार्यक्रम अगदी थोडक्यात आणि वेळेत आटोपला. यावेळी संगीत महोत्सवाचे आयोजक / प्रायोजक असे सर्वेसर्वा श्री. क्षितिज किशोर जयकर यांचाही सत्कार केला गेला. त्यावेळी श्री. सुनील जयकरांनी क्षितिजचे कौतुक केले. श्री. सुनील यांच्या अंगावर पिवळा झब्बा; तर श्री. क्षितीजच्या अंगावर लाल झब्बा होता. आमच्या कार्यकारी संपादिका सौ. मिनाक्षी जयकर माझ्या सोबत होत्या. त्या कौतुकाने कुजबुजल्या; ''बघ, बघ. मंगलमय हळदीकुंकूच जसे.' असो. ही आपली गंमत!

त्यानंतर मंचावर सुरेल गीतांचा प्रवास सुरू झाला. गायिका अर्चना गोरे यांनी 'मोगरा फुलला' म्हणून एक शांत वातावरण निर्माण केले. मग काय? मंदार आपटेंचे 'गुंतता हृदय हे', माधुरी करमरकरांचे 'हृदयी प्रीत जागते', श्रीरंग भावेंचे 'राधाधर मधु मिलिंद' अशी एकामागून एक गीते, पदे श्रोत्यांचे कान तृप्त करीत गेली. तृप्तीची साय मनावर धरायला या गायकांच्या मागे असलेली वाद्य संगीतकारांची तत्पर आणि कुशल साथ होतीच. हार्मोनियम संदीप मेस्त्री वाजवीत होते, सिंथेसायझरवर प्रशांत बेळे, तबल्यावर विशाल करंदीकर होते. तुषार देवलांचे दमदार ढोलक बोलत होते. ऑक्टोपॅडवर हुकुमत होती पंकज भोकावकर यांची. तर वाद्यमेळाचे शहेनशहा होते विजय तांबे. आपल्या सर्वांच्या परिचयाचे विजूदादा. म्हणूनच मध्यंतरानंतर खास त्यांच्या बासरीच्या स्वतंत्र वादनाने संपूर्ण सभागृह भारून टाकले. या उत्कट मैफलीचे बहारीने सूत्रसंचालन केले श्रेयसी वझे मंत्रवादी यांनी. बासरीवादनाआधी अरविंद गजेंद्रगडकरांनी सांगितलेली बासरीची खासियत श्रेयसीने खुलवून सांगितली. बासरीबरोबरच 'मागे उभा मंगेश' वेळी वाजवलेला मृदंग थेट मनावर गारुड करून गेला. या वादकांना वाखाणताना

(पान ६ कॉलम २ वर)

(पान ३ कॉलम ४ वरून)

''हे.... हे सगळं तुझ्यामुळे शक्य झालं आरुष....''

''काहीतरीच काय अर्चित? अरे, तू त्या विषयावर बोललास. तुझं बोलणं, तुझे मुद्दे फार छान होते. त्यात माझा काय संबंध?''

''अं हं! माझ्या ह्या यशाचं श्रेय तुझंच आहे. तू माझ्याकडे बघत 'आत्मविश्वास' ह्या विषयावर बोललास... आणि खरंच माझा आत्मविश्वास जागृत झाला.''

''चला.... माझा एवढा तरी उपयोग झाला म्हणायचा....''

''म्हणजे... आरुष, ह्याचा अर्थ असा की मला तुझ्या ह्या मानसिक आधाराची कुबडी घ्यावीच लागली. तू जर माझ्या आधी बोलला नसतास, तर मला नाही वाटत मी काही बोलू शकलो असतो.''

''गप्प रे अर्चित!''... आरूष न राहवून दम देण्याच्या स्वरात बोलला. अर्चितच्या मघाच्या आनंदाची जागा हळूहळू त्याच्या मनातला विषाद घेतोय हे ओळखून तो पुढे म्हणाला - ''गप्प बस. कधीतरी स्वत:ची कुवत ओळख अर्चित. असं कुबड्या वापरून कुणी पहिलं येत नसतं...

मुलाखतीच्या पुढच्या फेऱ्या पार पडल्या... आणि त्या इमारतीतून बाहेर पडताना आरूष आणि अर्चित दोघांच्याही हातात कंपनीची ऑफर लेटर्स होती.

''नोकरी मिळण्याची जाणीव किती मस्त असते नाही आरूष! माझ्यासारख्याला तर जास्तच आणि पगारसुद्धा खूपच आहे. तू पहिल्या पगाराचं काय करणार?'

''खर्च करणार!''

''अख्खा पगार?'' एवढं काय काय घेणार?''

''जे जे वाटेल ते ते खरेदी करणार... ''आरुष सांगत होता.

अर्चितनं घरी पोहोचताच ऑफर लेटर आईच्या पुढे धरलं आणि आनंदानं तो म्हणाला - ''आई, मला नोकरी मिळाली''

''हो? बरं झालं रे बाबा, देव पावला! मी देवाला नवस केला होता. म्हणून तुला नोकरी मिळाली.''

''म्हणजेऽऽ? माझं श्रेय काहीच नाही? सगळं श्रेय देवाचं?''

''अर्थातच.. त्यानंच तुला ती उत्तरं देण्याची बुद्धी दिली. आता माझी ओढाताण संपली. घर नीट चालवता येईल. घरात कितीतरी गरजेच्या वस्तू घ्यायच्या राहिल्यायत, त्याही घेता येतील आणि हो, सुरुवातीलाच बचत करायला सुरुवात कर. अडीअडचणीला ही बचतच उपयोगी पडते बघ!...'' आई आनंदानं अर्चितच्या पगाराच्या कल्पनेनंच सुखावली होती... त्याच्या पगाराच्या आधारावर तिनं घरखर्च बेतले...

अर्चितचा नोकरी मिळाल्याचा आनंद हळूहळू ओसरू लागला. त्याच्या पगारावर कल्पनेतही त्याचा पूर्ण हक्क उरला नव्हता...

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) अॅड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### नारळ साखर दिला

२४-११-१७ श्री. आदित्य अलर्क देसाई कु. आरती गुरव (आं.ज्ञा.)

### नांदा सौख्यभरे

२५-११-१७ श्री. मिहीर नितीन धैर्यवान कु. मयुरा विलास राजे (आं. ज्ञा.)
२५-११-१७ श्री. सुमेध सुमंगल वेलकर कु. स्नेहा सुधीर रेवनकर (आं. ज्ञा.)
४-१२-१७ श्री. ऋषभ जयदीप जयकर कु. भावना भरत राणे
११-१२-१७ डॉ. कु. पायल प्रदीप राणे श्री. आदित्य रवीन्द्र आचरेकर (आं. ज्ञा.)

### मरण

१०-११-१७ श्री. संकेत उत्तम कोठारे वय ४०, बोरीवली

## प्रभुतरुणास देणगी

✶ डॉ. सौ. सुरेखा आणि श्री. बन्सीधर सदाशिव धुरंधर यांजकडून ते आजी आजोबा झाल्या प्रीत्यर्थ रु. ५००१/-

✶ श्रीम. मीना रमेश जयकरकडून नात दीपश्री श्रद्धा लोकेश प्रभाकर सी. बी. एस. सी. परीक्षा पास झाल्याप्रीत्यर्थ १००१/-

✶ सौ. सुजाता दिवाकर कोठारे यांजकडून प्रभुतरुणास भाऊबीज रु. १०२/-

सर्व देणगीदारांचे आभार.

## अभिनंदन

✶ सौ. वैदेही श्रेयस राणे यांना बीइसीए, बेकॉन २०१७, मेलबर्नमधील एनर्जी एक्सलन्स अॅवॉर्ड लाभले.

✶ श्री. नंदकुमार कृष्णराव विजयकर यांनी दिव्यांनी उजळलेल्या बळीराजाचा फोटो पुणे येथील चढाओढीत पाठवला. त्याची निवड होऊन तो प्रदर्शनात मांडल्यावर अनेकांनी त्या छायाप्रकाशाचा सुंदर खेळ असलेल्या फोटोची प्रशंसा केली.

✶ श्री. विश्वास अजिंक्य यांचा लोकसत्ताच्या 'विवा' मध्ये वाळवीवर लेख प्रकाशित झाला. तसेच 'प्रभुतरुण' दिवाळी अंकातील 'माझा छंद' लेख 'महाराष्ट्र टाइम्सने पुन:प्रकाशित केला.

✶ 'दशक्रिया' हा राष्ट्रीय पुरस्कार विजेता चित्रपट कल्पना विलास कोठारे निर्मित आहे.

✶ प्रा. सुहासिनी कीर्तिकरांचा मुंबई विद्यापीठातील मर्ढेकरांवरील चर्चासत्रात सहभाग होता. तसेच 'साहित्य संघा'तर्फे बालकुमार साहित्य संमेलन आयोजित करण्यातही त्यांनी सहकार्य केले.

(पान ५ कॉलम ४ वरून)

गायिका अर्चना गोरेने दाद देता देता म्हटले की 'मागचे वादक जणू गातच आहेत' त्याला श्रोत्यांनीही दाद दिली. या दाद देणाऱ्या, घेणाऱ्या कार्यक्रमाची सांगता 'ने मजसी ने परत मातृभूमीला' या समूह गायनाने झाली. मध्यंतराआधी सावरकरांच्या 'जयोस्तुते' चाच गजर झाला होता. अर्थात सर्व गीतांची निवड अगदी चोखंदळपणे आणि स्वत:च्या रसिकतेची मोहर उमटवत केली होती स्वत: क्षितिज जयकरने. त्यांचे आणि श्री. किशोर जयकरांचे खास पाहुणेही या कार्यक्रमाला आवर्जून हजर होते. गंमतीचा योगायोग म्हणजे त्यात होती माझी विद्यार्थिनी आशा श्रॉफ आणि तिचा डेंटिस्ट मुलगा. श्री. सुहास बहुळकरही होते. बहुळकर आदल्याच दिवशी दिल्लीहून आले होते ते एक आनंददायी वार्ता घेऊनच. दिल्लीच्या दोन गॅलरीजनी प्रकल्पाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली - रावबहादूर महादेव धुरंधरांवर एक छोटे आणि एक मोठे पुस्तक तयार करण्याची! धुरंधरांची दीडशेवी जयंती अशी राष्ट्रीय पातळीवर पोहोचली. या बातमीने मध्यंतरात क्षितिजतर्फे दिली गेलेली कॉफी अधिकच चवदार झाली. श्री. किशोर जयकर आणि त्यांचा परिवार यांनी या कार्यक्रमासाठी अथक परिश्रम घेतले. त्यामुळे ठळकपणे जाणवले ते वेळेचे नियोजन. अत्युत्तम क्षमतेचे गायक आणि वादक एकत्रित आणून त्यांनी ' जे जे उत्तम, उदात्त सुंदर ते ते' सोशल समाजाच्या या कार्यक्रमात देऊन श्रोत्यांना तृप्त तृप्त केले. आता आमची म्हणजे श्रोत्यांच्या अपेक्षांचीही क्षितिजे विस्तारली आहेत बरं का.

## पत्र प्रतिक्रिया

६-११-२०१७

प्रिय आदरणीय सुहासिनी यांना
नम्र अभिवादन

रविवार दि. ५ नोव्हेंबर २०१७ रोजी रेडिओ अस्मिता वाहिनीवर रात्री ९ वाजता 'साहित्य सौरभ' या कार्यक्रमात आपण भाग घेतला होता. त्या कार्यक्रमात 'मराठी साहित्याची स्वातंत्र्यपूर्वीची व स्वातंत्र्यानंतरची वाटचाल याबाबत चर्चा होती. मी साहित्यसौरभचे कार्यक्रम आवर्जून ऐकत असते. आपण त्या कार्यक्रमात भाग घेतला त्याबद्दल आपले अभिनंदन.

मी आपल्या 'प्रभुतरुण' मासिकाची आजीव सभासद होऊ इच्छिते म्हणून मी सोबत रु. ५००/- (रुपये पाचशे)चा चेक पाठवीत आहे. तो आपण स्वीकारावा. माझे वय ९६ वर्षे असले तरीही मी आजीव सभासद होत आहे हे 'नवल' असले तरी त्यामागची माझी भूमिका आपण समजून घ्या. ''माणूस म्हणून जगणे जगताना आपण इतरांनाही आनंद देण्यासाठी झटतो, ते आपल्या जीवनाचे सार्थक असते. मी ज्या कार्यात गुंतले आहे इतके वर्षे म्हणजे जवळजवळ ७५ वर्षे त्यात इतरांनाही आनंद लाभला व ते अजूनही माझ्या संपर्कात आहेत; - आजच्या फास्ट व धगाधगीच्या जीवनाचा मनावर व शरीरावरही किती ताण पडला तरीही. त्याची मी दखल घेते व ते धैर्य मला माझ्या मातापित्याकडून लाभले आहे. मी कट्टर मार्क्सवादी - लेनिनवादी आहे. त्यासाठी बऱ्याच खस्ता शारीरिकही खाल्ल्या आहेत. खात आहे अजूनही. But that is a part a life of human being because unlike animals, man has a fulcrum Brain on which he lives as per the condition he or she faces.

मी बाबाबाजी-बुवाबाजी विरोधी आहे. परंतु श्रद्धा संकल्पना मानते ती वैज्ञानिक दृष्टीकोनातूनच. जाती जमातीच्या महत्त्वाला मी मानत नाही परंतु as a great revolutionary of communist camp मी मानवतामूल्ये - मानवतेचे संस्कार पाळण्याचा न चुकता प्रयत्न करते.

असो; आपण मला विनंती केली आहे की मी आपल्या 'प्रभुतरुण'साठी माझे अनुभवाचे लेख पाठवावेत; त्या तुमच्या विनंतीचा विचार करीनच. परंतु आताचा काळ पुस्तके न वाचण्याचा असल्या कारणामुळे मला शंका आहे की, माझ्या अनुभवातून कुणापुढे मी आदर्श ठेऊ शकेन? असो. मात्र तुमच्यासारखे प्रगतीशील शिक्षक विद्यार्थ्यांना योग्य वळणावर आणण्याची जी खटपट करीत आहात ते उत्तम आहे. त्यासाठी तुमच्या प्रयत्नांना शुभेच्छा प्रगट करून मी हे पत्र संपवीत आहे. मी ७० टक्के अंध असूनही पत्र माझ्या हस्ताक्षरानी लिहिले आहे.

**-सुंदर नवलकर**

## परीक्षेतील सुयश

**एम. कॉम. पार्ट टू**

कु. विनिता महेश कोठारे, द्वितीय वर्ग

## पत्र प्रतिक्रिया

Dear Suhasini Tai,

I was delighted to see your prabutarun Diwali issue. I've yet to read the entire contents and acknowledge to myself. However the first glances happen to read your poetry on Page 33. This reminded me of many poetries read by me for selecting my compilation Hithgujh karnarya kavita.

Regards,

Mrs Padmaja Vasudeo
compiler of Hithgujh Karnarya Kavita

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67